# तपोरत्नं माजलगावकर महाराज यांचे महानिर्वाण

आधुनिक विचारांचे

# वर्तमान

बीड । मंगळवार, १४ सप्टेंबर २०२१ । वर्ष : ३
आपले वृत्तपत्र, आपला आवाज
अंक : ४६ । पाने : ४ । मूल्य २ ₹


## 'ॐनमः शिवाय'च्या गजरात झाला समाधीविधी



माजलगाव : येथील सद्गुरू श्री मिस्कीन स्वामी मठ संस्थानचे मठाधिपती श्री तपोरत्नं प्रभू पंडिताराध्य शिवाचार्य माजलगावकर महाराज यांना शनिवार, दि.११ सप्टेंबर रोजी साश्रू नयनांनी अखेरचा निरोप देण्यात आला. हजारो शिवभक्तांनी 'ॐ नमः शिवाय'च्या गजरात तपोरत्नं माजलगावकर महाराजांना साश्रू नयनांनी निरोप दिला.

संबंधित वृत्तांत पान तीनवर...


बातमी व जाहिरातीसाठी संपर्क
9423209823
मुख्यालय : 'शिवगड' २३, मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव जि.बीड


# शासन-प्रशासन थेट बांधावर







प्रतिनिधी

बीड : जिल्ह्यात अतिवृष्टीने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना भरीव मदत व्हावी. यासाठी शासन-प्रशासन थेट बांधावर पोहचले. जिल्हाधिकारी राधाबिनोद शर्मा यांनी सोमवारी प्रत्यक्ष शेतात जावून नुकसानीची पाहणी केली. तर आणि माजलगावचे आमदार प्रकाश सोळंके यांनी बैलगाडीतून प्रवास नुकसानग्रस्त शेतीची पाहणी करून शेतकऱ्यांना दिलासा दिला. दरम्यान, शेतकऱ्यांच्या नुकसानीबाबत त्वरित पंचनामे करावेत असे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना जिल्हाधिकारी शर्मा आणि आमदार सोळंके यांनी दिले आहेत.

या पाहणी दौऱ्यात जिल्हाधिकारी शर्मा यांनी बीड तालुक्यातील कुर्ला येथील सिंदफणा नदीवरील केटीवेअर बंधाऱ्याचे ठिकाणी नदीने पात्र बदलल्यामुळे वाहून गेलेल्या शेतजमिनीची पाहणी केली तसेच भाट सांगवी राक्षसभुवन मार्गावरील भुक्कड मोड नदीवरील वाहून गेलेला पूलाची पाहणी केली. नंतर जिल्हाधिकारी यांचा दौरा म्हाळस जवळा, इट बेडकुचीवाडी रामगाव, पिंपळनेर बेलेवाडी या गावच्या शेतजमिनी पडलेली घरे वाहून गेलेले पूल इत्यादींची पाणी केली. यावेळी पिंपळनेर येथील दलित वस्तीमध्ये जाऊन बाधितांची आस्थेवाईकपणे चौकशी केली. यावेळी जिल्हाधिकारी शर्मा यांनी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे उपअभियंता व सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता यांना थेट बांधावरूनच भ्रमण दूरध्वनी करून वाकलेले विद्युत पोल, तारा तसेच वाहून गेलेले पूल यांचे तात्काळ दुरुस्ती व पर्यायी व्यवस्था करणे बाबत सक्त सूचना दिल्या. सदर दौऱ्यादरम्यान पदाधिकारी शिवसेना जिल्हाप्रमुख कुंडलिक खांडे, जिल्हा परिषद सदस्य गणपत डोईफोडे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना झालेल्या नुकसानीची माहिती अवगत करून दिली. तसेच जिल्हाधिकारी शर्मा यांनी गेवराई तालुक्यात देखिल भेट देऊन पाहणी केली होती. त्यांनी भाटसांगवी-राक्षसभुवन रोडवरील तुक्कड मोड नदीवरील पूल, जवळा येथील शेतीसह विविध ठिकाणी पाहणी केली आहे.

## आमदार प्रकाश सोळंके बैलगाडीतून गोदाकाठी

माजलगाव : गावभेट दौऱ्यानिमित्त सोमवारी आमदार प्रकाश सोळंके यांनी गोदाकाठच्या सोन्नाथडी, शुक्लतीर्थ लिमगाव येथे भेट देवून अतिवृष्टीमुळे झालेल्या परिस्थितीची पाहणी केली. याप्रसंगी शेतकऱ्यांच्या इतर समस्या जाणून घेतल्या. या दरम्यान, सोन्नाथडी येथील पांदणरस्त्याची अवस्था बिकट झालेली आहे. तेथील पाहणी करून लवकरात लवकर शेतकऱ्यांना त्यांची रस्त्याची समस्या सोडवण्याचे आश्वासनही सोळंके यांनी दिले. या सोबतच दोन्ही गावातील रस्ते, स्मशानभूमी, पुल, पुनर्वसन इत्यादी विकासकामे व समस्येवर नागरिकांशी विचारविनिमय करून लवकर त्यांच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी कायम प्रयत्नशील राहील अशी ग्वाहीही आमदार सोळंके दिली. याप्रसंगी मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अशोक डक यांच्यासह शेतकऱ्यांची उपस्थिती होती.

## भर पावसात पालकमंत्र्यांचा पाहणी दौरा

परळी : तालुक्यातील गोदाकाठच्या पोहनेर, कासारवाडी, डिग्रस, बोरखेड, तेलसमुख, ममदापूर या गावांना प्रत्यक्ष भेट देवून पूरग्रस्त गावकऱ्यांशी संवाद साधत शेतकऱ्यांच्या बांधावर, पारावर जावून पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी नुकसानग्रस्त भागातील नदी, नाल्याकडील असलेल्या शेताची पाहणी केली.राज्य सरकार शेतकऱ्यांच्या पूर्णपणे पाठीशी असून झालेल्या नुकसानीचे सरसकट पंचनामे करण्याची प्रक्रिया सुरू आहे. नुकसान झालेला एकही शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही, यादृष्टीने संयुक्त पंचनामे व अन्य कार्यवाही करण्याचे निर्देश संबंधित प्रशासकीय यंत्रणांना दिले आहेत, असे धनंजय मुंडे यांनी अतिवृष्टी पाहणी दौऱ्यादरम्यान म्हटले आहे.



## फास्टट्रॅकन्यूज



### धारूर, केजचा पाणीप्रश्न मिटला 'मांजरा'त ८४ टक्के पाणीसाठा

बीड : आठ दिवसांपूर्वी बीड जिल्ह्यासह मराठवाड्यासह मुसळधार पाऊस पडला. या पावसामुळे राज्यभरातील सर्व धरणात पाण्याचा साठा मोठ्या प्रमाणात जमा झाला. काही धरणे पूर्णतः भरली तर काही धरणाने ५० टक्क्यांच्या पुढे पातळी गाठली. केज तालुक्यातील मांजरा धरणात ८४ टक्के पाण्याचा साठा जमा झाला असून या पाणी साठ्यामुळे लातूर व बीड जिल्ह्यातील केज, धारूर तालुक्यातील १२ गावचा पाण्याचा प्रश्न मिटला आहे. गेल्या सलग तीन वर्षापासून हे धरण भरत आहे.



### एस.एम.देशमुख यांच्या प्रयत्नांमुळे देवडीत पोलीस चौकी

वडवणी : तालुक्यातील देवडी येथे पोलीस चौकी सुरू करण्याचे आश्वासन गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी दिले. देवडी गावचे भूमिपूत्र आणि अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांनी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांची मंचर येथे भेट घेतली. यावेळी देशमुख यांनी देवडी येथे पोलीस चौकी सुरू करण्याची विनंती केली. गृहमंत्र्यांनी लगेच ती मान्य केली.

### जिल्हा परिषद पोटनिवडणुकांचे वेळापत्रक जाहीर

मुंबई : राज्यातील पाच जिल्ह्यातच्या जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या पोट निवडणुका येत्या ५ ऑक्टोबर रोजी पार पडणार आहेत. धुळे, नंदुरबार, अकोला, वाशिम व नागपूर जिल्ह्यांतील जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या पोट निवडणुका होणार आहेत. तसेच पालघर जिल्हा परिषद आणि त्यांतर्गतच्या रिक्तपदांच्या पोट निवडणुकांसाठी देखिल त्याच दिवशी मतदान होणार असून सर्व ठिकाणी ६ ऑक्टोबर रोजी मतमोजणी होणार असल्याची घोषणा राज्य निवडणूक आयुक्त यू.पी.एस.मदान यांनी केली आहे.




### मौलाना हाफिज मोहम्मद नदीम सिद्दीकी प्रदेशाध्यक्षपदी

माजलगाव : जमियत उलेमा महाराष्ट्रच्या प्रशासक मंडळाची एक महत्त्वपूर्ण बैठक सोमवारी अकोला जिल्ह्यातील दारूल उलूम सोनोरी येथे आयोजित करण्यात आली होती. यामध्ये महाराष्ट्रातील विविध जिल्हे आणि तालुक्यांचे अध्यक्ष आणि प्रशासकांसह सदस्य मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या बैठकीत, हजरत मौलाना सय्यद मुफ्ती अफ्फान साहिब मन्सूरपुरी (अध्यक्ष धार्मिक शिक्षण मंडळ, जमीयत उलेमा उत्तर प्रदेश) यांच्या देखरेखीखाली मौलाना हाफिज मोहम्मद नदीम सिद्दीकी यांची पाचव्या टर्मसाठी जमीयत उलेमा महाराष्ट्राचे अध्यक्ष म्हणून निवड झाली आहे.

## माजलगाव धरणाचे 'सुंदर सागर' नामकरण करावे : ॲड.प्रमोद तौर

प्रतिनिधी

माजलगाव : महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे सुपूत्र लोकनेते दिवंगत सुंदरराव सोळंके यांचे माजलगाव धरणाला 'सुंदर सागर' असे नामकरण करावे, अशी मागणी जोर धरत आहे. महाराष्ट्र मुख्यमंत्री उध्दव ठाकरे, जलसंपदा मंत्री जयंत पाटील, बीडचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांना निवेदन देवून राष्ट्रवादी काँग्रेसचे माजलगाव तालुका सरचिटणीस ॲड.प्रमोद तौर यांनी केली आहे.



महाराष्ट्र जडणघडणीत लोकनेते सुंदरराव सोळंके यांचे मोठे योगदान आहे. मराठवाड्याचे भूमिपुत्र म्हणून सुंदरराव सोळंके यांनी विकासाची गंगा खेचून आणली. महाराष्ट्र राज्याच्या तत्कालीन सरकारमध्ये मंत्रीमंडळात सुंदरराव सोळंके उपमुख्यमंत्री पदावर कार्यरत असताना अतिशय प्रभावी काम केलेले आहे. यात विविध खात्यांचे मंत्री असताना सामान्य माणसांच्या जीवनात अमूलाग्र बदल होईल, असे अनेक लोककल्याणकारी प्रकल्प सोळंके यांनी उभे केले. सोळंके यांच्या पाठपुराव्यामुळे माजलगाव धरण पूर्णत्वास केले. माजलगाव धरण्याच्या उभारणीमुळे तालुक्यातील सिंचनक्षेत्र वाढवून हजारो हेक्टर जमीन ओलिताखाली आली. यामुळे शेतकऱ्यांच्या जीवनात हरितक्रांतीचे स्वप्न सत्यात उतरले. माजलगाव धरणाबरोबरच मांजरा, कुंडलिका आणि सरस्वती सारखे अनेक जलप्रकल्प कार्यान्वित झाले. त्यामुळे विकासाभिमुख लोकनेते दिवंगत सुंदरराव सोळंके यांच्या नावाने माजलगाव धरणाचे 'सुंदर सागर' असे नामकरण करण्यात यावे, अशी मागणी ॲड.प्रमोद तौर यांनी केली आहे.






## शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचा आरोग्य यज्ञ आता माजलगावात

### वडवणी, धारूर आणि माजलगाव तालुक्यात मोफत आरोग्य शिबीर

प्रतिनिधी

माजलगाव : वंदनीय बाळासाहेब ठाकरे शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचा आरोग्य यज्ञ माजलगाव मतदारसंघात पोहचला आहे. दरम्यान, हा आरोग्य यज्ञ दि.१६ सप्टेंबरपासून सुरू होणार आहे. तो १९ सप्टेंबरपर्यत असेल, अशी माहीती शिवसेना वैद्यकीय मदत कक्षामार्फत देण्यात आली आहे.

शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचा आरोग्य यज्ञ आता बीड जिल्ह्यात पोहचला आहे. गुरूवार, दि.१६ सप्टेंबर रोजी माजलगाव तालुक्यातील मनूर, लुखेगाव, गोविंदपूर, मंजरथ, ढेपेगाव या गावी तर शुक्रवार, दि.१७ सप्टेंबर रोजी शिंपेटाकळी, नागडगाव, सांडस चिंचोली, आबेगाव, सुरूमगाव आदी गावात कक्षामार्फत मोफत आरोग्य तपासणी शिबीर घेण्यात येणार आहे. गरजूंना आवश्यक त्या औषधी गोळ्यांचे वितरण करण्यात येणार आहे, अशी माहिती शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे कक्षप्रमुख मंगेश चिवटे यांनी दिली आहे. माजलगाव तालुक्यानंतर किल्लेधारूर आणि वडवणी तालुक्यात आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात येणार आहे. याप्रसंगी शिवसेना बीड जिल्हाप्रमुख अप्पासाहेब जाधव, वडवणी तालुकाप्रमुख संदिप माने, किल्लेधारूर तालुकाप्रमुख बाळासाहेब कुरूंद आदी उपस्थिती राहणार आहे.

शिबीरे यशस्वी करण्यासाठी शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या बीड जिल्हा समन्वयक उज्वलाताई भोपळे, माजलगाव तालुका समन्वयक भगीरथ तोडकरी, वडवणी तालुका समन्वयक ओमराजे जाधव, बीड तालुका समन्वयक विजयराज काटे, गेवराई तालुका समन्वयक धर्मराज आहेर, अंबाजोगाईचे खंडू पाटील, धारूरचे गोवर्धन बडे, बालासाहेब फपाळ आदी परिश्रम घेत आहेत.



## संपादकीय

# थिंक सेलिब्रेट, थिंक पॉझिटिव्ह

महाराष्ट्राचे लोकसंचित म्हणून गणेशोत्सवाकडे पाहिले जाते. हा उत्सव विचारांचा उत्सव मानला जातो. भारताचे लक्षवेधी सांस्कृतिक वैशिष्ट्ये ठरलेला आणि मुख्यतः महाराष्ट्रासह सध्या देश, परदेशात भूषणावह असलेला व १२८ वर्षाची परंपरा लाभलेला वार्षिक सार्वजनिक गणेशोत्सव शुक्रवारी मोठ्या थाटामाटाने आणि उत्साहाने सुरू झाला आहे. श्रावण महिना संपत आला की, वेध लागतात ते आपल्या प्रिय गणरायाच्या आगमनाचे. बाप्पा नुसता आठवला तरी मन कसं प्रसन्न होतं. गणपती हे तर प्राचीन काळापासून मराठी माणसांचे लोकप्रिय दैवत आहे. ज्ञानाच्या क्षेत्रात तो बुद्धिदाता, तर सकाम साधना करताना तो विघ्नहर्ता म्हणून ठरला. त्याची मनापासून भक्ती केली, तर तो साधकाच्या मार्गातील सर्व विघ्ने दूर करतो आणि सर्व प्रकारची मनोवांछित सुखे प्रदान करतो, अशीही श्रद्धा या दैवताविषयी जनसामान्यांत मनात दृढ झाली आहे. प्रत्येक मंगल कार्याच्या शुभप्रसंगी त्याचे आवाहन करण्याची तसेच त्याचे प्रथम पूजन केले जाते. गणपतीचे रूप हे ओंकाराकार आहे. ओंकारावर बुद्धी व लक्ष केंद्रित केली, तर भौतिक ऐश्वर्य, वैश्विक सामर्थ्य, बौद्धिक साक्षात्काराची प्राप्ती होते. तसेच गणपती हा समूहाचा नेता आणि तत्त्वज्ञानाची देवता. त्याचप्रमाणे गणेश ही विद्येची देवता! साहित्यापासून संगीतापर्यंत आणि समरांगणापासून भोजनापर्यंत अधिवास करीत असते. ती गणांची देवता म्हणून तिला गणपती' हे अधिदान प्राप्त झालेले आहे. भाद्रपद शु. चतुर्थीला वरदा चतुर्थी' असेही म्हणतात. त्या दिवशी गणपतीची मृण्मयमूर्ती घरी आणून सिद्धिविनायक या नावाने तिची दीड दिवस स्थापना करून विधिपूर्वक पूजा केली जाते. इ.स. १८९२ मध्ये पुण्याचे सरदार नानासाहेब खाजगीवाले हे ग्वाल्हेर येथे गेले असताना दरबारी गणेश उत्सव सार्वजनिक स्वरूपात करीत असल्याचे त्यांना दिसून आले. त्यावरून हा उत्सव यापेक्षाही अधिक आनंद आणि उत्सवी स्वरूपात पुण्यामध्ये करावा, अशा कल्पनेने ते परत आल्यानंतर खाजगीवाले, धोडवडेकर व भाऊ रंगारी यांचे तीन सार्वजनिक गणपती बसले. सार्वजनिक गणेश उत्सवाची ही कल्पना लोकमान्य टिळकांना आवडली. या उत्सवाच्या माध्यमातून विस्कळीत होत चाललेला हिंदू समाज संघटित होऊन ब्रिटिशांच्या विरोधात स्वातंत्र्याच्या आंदोलनाचे पाऊल पुढे पडेल ही कल्पना लोकमान्यांनी हिरीरीने अमलात आणण्याचे ठरवून कार्यारंभाला सुरुवात केली. सर्वधर्मसमभाव निर्माण करण्यासाठी स्वातंत्र्यपूर्व काळात सुरू केलेला या उत्सवाबाबत प्रारंभी काही लोकांनी या गणेश उत्सवाला आक्षेप घेतला. समाजातील विशिष्ट वर्गाचा हा उत्सव असून मुसलमानांच्या मोठ्या प्रमाणात निघणाऱ्या ताबूत मिरवणुकांना विरोध करण्यासाठी हे टिळकांच्या डोक्यातून निघाले असल्याची टीका जाहीरपणे लोक करू लागले. महाराष्ट्रात त्या वेळी काही ठिकाणी प्लेगची साथ पसरली होती, आता ही साथ का पसरली, तर देवघरातला गणपती चौकात आणून बसविला म्हणून, अशी सडकून टीका होऊ लागली; परंतु लोकमान्यांच्या प्रभावी राष्ट्रव्यापी नेतृत्वापुढे या आक्षेप घेणाऱ्यांचे काही चालले नाही. पुण्यात सार्वजनिक गणपती स्वतः टिळकांनी १८९४ मध्ये विंचूरकरांच्या वाड्यात बसवला. अलीकडे वाद असला तरीही या उत्सवाला सार्वजनिक व आंदोलनाची पार्श्वभूमी करण्याचा मान लोकमान्यांनाच जातो. लोकमान्य टिळकांनी पारतंत्र्याच्या काळामध्ये या उत्सवाला सार्वजनिक स्वरूप दिले. त्यामागे मुख्यतः लोकशिक्षण आणि समाज जागृती हाच एकमेव उद्देश होता. शिवाय या सार्वजनिक उत्सवामध्ये समाजातील सर्व जाती-धर्माचे, श्रीमंत-गरीब अशा विविध समाज घटकांनी गुण्यागोविंदाने एकत्र यावे आणि सलोखा, सहकार्य आणि बंधुभावाच्या नात्याने परस्परांतील नाते घट्ट होऊ शकेल असाही या उत्सवाला सार्वजनिक स्वरूप देण्याचा त्यांचा विधायक हेतू होता. सश्रद्ध भावनेने साजऱ्या भावनेने साजऱ्या होणाऱ्या या उत्सवाला लोकमान्यांचा खरा उद्देश लोकशिक्षण आणि लोकजागृती असाच होता. टिळकपर्वात सार्वजनिक गणपती उत्सव म्हणजे ज्ञानाची सदावर्तेच होती. स्वतः लोकमान्य टिळक, न.चिं.केळकर, नाट्याचार्य खाडिलकर, काळकर्ते परांजपे, महर्षी शिंदे, मदन मोहन मालवीय, सरोजिनी नायडू, बिपीनचंद्र पाल, आचार्य विनोबा भावे, साने गुरुजी, सेनापती बापट, रँग्लर परांजपे, वीर सावरकर, दादासाहेब खापर्डे यांच्यासारखे हिंदू वक्ते ज्याप्रमाणे होते, त्याप्रमाणे मौलवी सय्यद मुर्तुजा, बॅ.आझाद, डॉ.एस.एम.अल्ली, जनाब गुलशेर खान, रसुलभाई यांसारखे मुसलमान वक्तेही होते. पुढे गांधीयुगातही गणेश उत्सवात राष्ट्रीय चळवळीने अधिक जोर धरला. गणेशोत्सवातील मेळ्यातून अनेक कलावंत, वक्ते, कीर्तनकार, नृत्यकार, शाहीर, गवई, नट यांच्या कलेला वाव मिळाला. समाजातून नेतृत्व पुढे येऊ लागले. दातृत्व वाढीस लागले. समाजा-समाजातील भेदाभेद दूर होऊन समता प्रस्थापित होण्यास फार मोठे सहाय्य झाले. थोडक्यात काय, देवांचा देव श्री गणेश हा इथल्या सामाजिक उत्थानासाठी आवश्यक अशा प्रेरणा जागवणारा देव आहे. इथल्या सांस्कृतिक समन्वयाचं प्रतीक होऊन राहिलेला देव आहे. प्रथम या उत्सवाकडे राष्ट्रीय उत्सव म्हणून बघितले गेले. या उत्सवाचा विचार करता १८९३ आरंभापासून ते १९२० लोकमान्यांच्या मृत्यूपर्यंत, त्यानंतर १९२० ते १९४७ देशाला स्वातंत्र्य मिळेपर्यंत, १९४७ ते १९८०, १९८० नंतर आजच्या तंत्रज्ञान-संगणक युग असा ४ टप्प्यांचा कालखंड आहे. सुरूवातीच्या नऊ दशकांत नव्हता तो फरक गेल्या तीन दशकांत जाणवतो आहे. गेल्या १२५ वर्षात समाजात, देशात आणि जगातही प्रचंड स्थित्यंतरे झाली. लोकमान्यांनी म्हणा की, भाऊसाहेब रंगारी यांनी म्हणा सार्वजनिक गणेशोत्सवाचे लावलेल्या या रोपट्याचा वेल अमरवेलीसारखा चांगलाच फोफावला आहे.

# शिक्षण व्यवस्थेला धोरणात्मक निर्णयांची प्रतीक्षा

**मुलांच्या अफाट गुणवत्तेला वाव मिळू शकेल, अशी शालेय शिक्षण प्रणाली अंगीकारणं ही काळाची गरज आहे. येणाऱ्या पिढीला भविष्यातल्या आव्हानांसाठी तयार करताना शिक्षण क्षेत्राशी जोडलेल्या प्रत्येक व्यक्तीने मानसिकता बदलणं गरजेचं आहे. त्यासाठी धोरणात्मक पावलं उचलावी लागतील. अंमलबजावणीत कणखरता दाखवावी लागेल.**

शिक्षणनामा

सुशील मुणगेकर

स्वातंत्र्याच्या गेल्या ७४ वर्षांमधे एक देश आणि समाज म्हणून आपण अनेक सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, आर्थिक, तंत्रज्ञान आणि दूरसंचार यामधल्या स्थित्यंतरातून गेलो आहोत. तसं जगातले सगळेच देश अशा स्थित्यंतरातून संक्रमित झाले आहेत. पण त्यातले बहुतांश देश भारतापेक्षा एक तर तुलनेने लहान आहेत किंवा एकसंध आहेत.जगातली सगळ्यात मोठी लोकशाही १३५ कोटी लोकसंख्या आणि सरासरी वय ३२ असलेल्या आपल्या देशातल्या जनतेला धर्म, जाती, भाषा, प्रांत, संस्कृती, भौगोलिक पार्श्वभूमी यातली विविधता या सगळ्यांच्या पार्श्वभूमीवर देशातल्या जनतेला अशा स्थित्यंतरासाठी आणि त्यातून होणाऱ्या बदलांसाठी तयार करणं हा सरकारच्या मनुष्यबळ विकासाच्या धोरणाचा सर्वात महत्त्वाचा उद्देश आहे. देशातलं मनुष्यबळ घडवण्यामधे देशाच्या शालेय शैक्षणिक धोरणाचा अत्यंत मोलाचा वाटा आहे. ही उद्दिष्टं लक्षात ठेवून गेल्या ७४ वर्षातल्या आपल्या कामगिरीचा ऊहापोह करतानाच भविष्यातली आपली उद्दिष्टं आणि आव्हानांसाठी आपल्या शालेय शैक्षणिक धोरणाची किती तयारी आहे याचं मूल्यमापन करणं गरजेचं आहे.



ब्रिटिशांच्या शिक्षणपद्धतीचं अनुकरण

स्वातंत्र्य मिळाल्यापासून आजपर्यंत शाळा' हे देशातल्या शैक्षणिक आणि सामाजिक क्रांतीचं केंद्र राहिलंय याबद्दल दुमत नाही. १९४७ ला असलेल्या केवळ ५ हजार शाळांपासून सुरवात करत आज आपल्या देशाच्या कानाकोपऱ्यात आणि खेडोपाड्यात १५.५ लाख शाळांचं जाळं पसरलंय. जवळपास २८ कोटी विद्यार्थी यामधे शिक्षणाचा लाभ घेत आहेत. तेवढ्याच मुलांना शिकवण्याची यंत्रणा चीनमधे भारताच्या तुलनेने केवळ ३५ टक्के शाळांमधून केली जाते. चीन आणि भारताच्या सामाजिक समस्या भिन्न असल्याने थेट तुलना यथोचित नसली तरी चीनने उभारलेलं शालेय शिक्षणाचं जाळं किती कार्यक्षम आहे याची प्रचिती येते. शिक्षण हे केवळ विशिष्ट वर्गाची आणि जातींची मक्तेदारी समजली जाणाऱ्या या देशात शिक्षण हा आपल्या उद्धाराचा एकमेव मार्ग आहे' अशी धारणा या देशातल्या गलितगात्र, मागासलेल्या, गरीब आणि उपेक्षित समाजामधे रुजवण्यात शाळा' या संकल्पनेने क्रांतिकारक हातभार लावला आहे ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. हा विस्तार करत असतानाच ब्रिटिशांनी आखून दिलेल्या शालेय शिक्षण पद्धतीमधे कुठलेही मूलभूत बदल न केल्याने आपण २५० वर्षांपूर्वी आखलेल्या धोरणांचं अनुकरण केल्याने ज्ञानाचे शिक्षकाकडून विद्यार्थ्याकडे एकतर्फी हस्तांतर, सूचना केंद्रीकरण, स्मृतीवर आधारित मूल्यमापन, साचेबद्ध मूल्यांकन पद्धती, पुस्तकी ज्ञान, मोजकेच विषय, प्रत्येक विद्यार्थ्याच्या कौशल्याला बगल देऊन सर्व विद्यार्थ्यांसाठी समान शिक्षण यांसारख्या अनेक गोष्टी वर्षानुवर्षे चालत राहिल्या.

असं हरवलं मुलांचं शिक्षण

पाश्चिमात्य देशात ३०० वर्षांपूर्वी आलेली औद्योगिकीकरणाची लाट भारतामधे खऱ्या अर्थाने स्वातंत्र्यानंतर आली आणि उद्योगांना लागणारे मनुष्यबळ तयार होत असल्याने आणि त्यातून लोकांना मुबलक रोजगार मिळू लागल्याने अशा शिक्षणपद्धतीच्या उणिवा झाकल्या गेल्या. गेल्या तीन दशकांमधे आर्थिक उदारीकरण, तंत्रज्ञान आणि दूरसंचार यातली उत्क्रांती, उत्पादन आणि सेवा यांचं बदलतं समीकरण यामुळे जागतिक अर्थव्यवस्थेशी भारताच्या अर्थव्यवस्थेची नाळ जुळत असताना आणि आपल्यातील प्रत्येकाचे जीवनमान बदलत असताना आपली शालेय शिक्षणाची पद्धत, त्याचा ढाचा, त्यातील विषय, मूल्यमापन प्रक्रिया यामध्ये काहीही रचनात्मक आणि गुणात्मक बदल झालेला नाही. सेवा क्षेत्राची उत्पादन क्षेत्रापेक्षा झालेली सरशी, तंत्रज्ञानामुळे पारंपरिक रोजगाराला बसलेली खीळ, नवीन कौशल्यांची गरज, त्यातून उच्च शिक्षणात फुटलेले व्यावसायिक प्रशिक्षणाचं पेव, गेल्या दहा वर्षात रोजगार निर्मितीत झालेली विलक्षण घट या सगळ्या पार्श्वभूमीवर शाळा' म्हणजे केवळ बोर्डाच्या परीक्षेत मार्क मिळवून आपल्याला हवे ते व्यावसायिक प्रशिक्षण घेण्यास पात्र' होण्याची एक पायरी राहिली आहे. याचं रूपांतर पुढे विद्यार्थ्यांच्या आणि पालकांच्या मार्क्स मिळवण्याच्या केविलवाण्या धडपडीत झालं. शिक्षक, शिकवण्या, ऑनलाईन कंपन्या मुलांना शिकवण्यापेक्षा मार्क्स अधिक कसे मिळतील हे दाखवण्यासाठी कुरघोडी करू लागले तर शाळा आणि शिक्षण मंडळं पैकीच्या पैकी मार्क्स मिळणाऱ्यांचे कौतुक सोहळे साजरे करण्यात मग्न झाले आणि या सगळ्या बजबजपुरीमधे खऱ्या अर्थाने मुलांचं शिक्षण' हरवलं.

सगळ्यांची तारांबळ उडालीय

दरवर्षी भरणारा हा बाजार सुरू असतानाच शालेय शिक्षणाची चर्चा गेल्या वर्षभरात ऐरणीवर येण्यासाठी दोन गोष्टी घडल्या. एक म्हणजे कोरोनामुळे बंद पडलेल्या शाळा आणि त्यामुळे शिक्षणावर आलेली संक्रांत आणि दुसरे म्हणजे केंद्र सरकारचे नवीन शैक्षणिक धोरण. एक क्लिक करावं तसं कोरोनामुळे शालेय शिक्षण ऑनलाईन झालं. काहीही पूर्वकल्पना आणि तयारी नसताना ऑनलाईन शिक्षणाच्या विश्वात ढकललं गेल्यानंतर सरकार, शिक्षण मंडळं, शाळा, विद्यार्थी, शिक्षक आणि पालक यांची तारांबळ उडणं साहजिकच होतं. आज १८ महिन्यांनंतर त्यात काही फरक पडला आहे असं म्हणता येणार नाही. ऑनलाईन शिक्षणाच्या माध्यमातून शालेय शिक्षणात खंड पडू दिला नाही', असं म्हणणारे लोक आता शाळा लवकरात लवकर सुरू कराव्यात' यासाठी आग्रही होऊ लागले आहेत.

ऑनलाईन शिक्षण उलट्या दिशेने

मागच्या वर्षभरात फोन, लॅपटॉप आणि इंटरनेट घरोघरी असलेला अभाव, पुरेसं मार्गदर्शन नसल्याने ऑनलाईन वर्ग भरवताना शिक्षकांची उडालेली तारांबळ, ऑनलाईन शिक्षणासाठी लागणाऱ्या विषयाचं खेळात्मक मांडणीचं प्रशिक्षण नसण्याने जुन्याच अध्यापन प्रक्रिया वापरण्याकडे शिक्षकांचा कल आहे. मुलांमधल्या विषयांच्या आकलनाविषयीची संदिग्धता, मूल्यमापन पद्धतीबद्दल स्पष्टतेचा अभाव या सगळ्यातून गेल्या शैक्षणिक वर्षाचा खरा लेखाजोखा मांडायचा झालाच तर निराशाच पदरी पडेल यात वाद नाही. यातूनही सर्वात धोकादायक परिणाम म्हणजे ६० ते ६५ टक्के मुलांकडे साधन आणि इंटरनेटची सुविधा नसल्याने यामधली बहुतांश मुलं शिक्षणापासून वंचित राहिली आहेत आणि त्यातली ३० ते ३५ टक्के मुले ही कायमची शिक्षणाच्या परिघाबाहेर फेकली जातील, असा तज्ज्ञांचा अंदाज आहे. गावोगावी पसरलेल्या शाळांमुळे जो काही शिक्षणाचा प्रसार झाला होता, तो ऑनलाईन शिक्षणाने उलट्या दिशेने चालला आहे. यामध्ये प्रामुख्याने मुली, ग्रामीण विद्यार्थी, गरीब, मागासवर्गीय आणि उपेक्षित वर्गातल्या मुलांचा भरणा जास्त आहे.

शैक्षणिक धोरणाचं मूल्यमापन

कोरोनाच्या लाटेची तीव्रता लक्षात घेऊनही शाळा पुन्हा सुरू करणं हा एक पर्याय नसून सरकारसमोरचा एकमेव मार्ग आहे आणि त्यासाठी केंद्र आणि सर्व राज्य सरकारांनी अगतिकता दाखवली नाही तर एका पिढीचं भवितव्य अंधारमय होताना आपल्याला हताशपणे बघावं लागेल. वाजत-गाजत आलेलं केंद्र सरकारचं नवीन शैक्षणिक धोरण' आपल्या शालेय शिक्षण प्रणालीत काही मूलभूत आणि आमूलाग्र बदल करून त्यातला साचलेपणा दूर करेल अशी सगळ्यांची धारणा होती. त्याचा विस्तृत परामर्श इथं घेणं शक्य नाही. काही अंशी व्यावसायिक प्रशिक्षण, जीवन कौशल्यं, नावीन्याचा ध्यास, समस्या सोडवण्याची मानसिकता यांचा शालेय शिक्षणात अंतर्भाव करून काही अंशी पोकळी भरून काढण्याची तयारी दाखवली आहे. पुढच्या १० वर्षांमधे याची अंमलबजावणी किती गंभीरपणे होते यावर त्याचं मूल्यमापन करता येईल. हे जरी खरं असलं, तरी गुणात्मक, तीव्र आणि मूलभूत बदलांपेक्षा संरचनात्मक बदलांमधे जास्त अडकून पडल्याचं दिसतं. या सगळ्याचा विचार करता एका बाजूला आर्थिक महासत्ता होण्याचं स्वप्न लोकसंख्येच्या तुलनेने जगातली दुसरी मोठी बाजारपेठ, इंग्रजी भाषा बोलणारे जगातलं सगळ्यात मोठं मनुष्यबळ असणारा देश अशी संधी असताना, आणि अर्थात राजकीय पातळीवर आर्थिक, सांस्कृतिक आणि सामाजिक स्थैर्य जपलं जाण्याची शाश्वती या सगळ्या पार्श्वभूमीवर मुलांच्या अफाट गुणवत्तेला वाव मिळू शकेल, अशी शालेय शिक्षण प्रणाली अंगीकारणं ही काळाची गरज आहे. यातल्या काही मूलभूत गोष्टी.

(क्रमशः)

# समाजाला एकसंघ ठेवणारे गुरूवर्य

**समाजातील दीपस्तंभासम कार्य करणारे श्री तपोरत्नं प्रभू पंडीताराध्य शिवाचार्य महाराज माजलगावकर समाज बांधवांसाठी प्रेरणादायी होते. त्यांनी समाजाला एकसंघ ठेवण्याचे महान कार्य केले. आयुष्याच्या ९४ व्या वर्षी शिवैक्य झाले आहे. त्यांच्या जाण्याने वीरशैव लिंगायत समाज पोरका झाला आहे. माजलगावकर महाराजांचे महत्त्व आणि महात्म्ये विशद करणारा रामेश्वर कानडे यांचा हा विशेष लेख वर्तमानच्या वाचकांसाठी देत आहोत.**

निमित्त



रामेश्वर जी.कानडे

महाराजांनी समाजासाठी आणि धर्मरक्षणासाठी अनेक कामे करुन भक्तांना वेळोवेळी मार्गदर्शन केले आहे. गुरुतत्व स्वरूपाने प्रकट आईच्या रुपात झालेले आहे, पिता हे दुसरे गुरु ते धीर धाडस शौर्य कर्म कुशलता निती व्यवहारातुन तीनही आश्रमात राष्ट्र विश्वास, व सक्षम व्यक्तीत्व प्रदान तिसरे गुरु म्हणजे सदगुरु.. एका शारीरीक, बौध्दीक, मानसिक, दैविक व आध्यात्मिकतेच्या माध्यमातुन संस्कारीत करतात व ईश्वररुपाकडे नेतात. तेच खरे सदगुरू, असे आमचे माजलगाव येथील सदगुरू श्री तपोरत्न प्रभु पंडिताराध्य शिवाचार्य महाराज, ज्यांनी संन्यासी वृत्ती ठेवून आपले आयुष्य समाजासाठी खर्च केले, समाजाला नवी दृष्टी देण्याचे काम केले. अनेक स्तरातील माणसे व समाज संघटीत करुन धर्माचे, शान देवून समाज परिवर्तन मोठे कार्य मराठवाड्याच्या माजलगाव नगरीतुन केले आहे. त्यांनी समाजापयोगी कामे करुन वेळोवेळी ठिकठिकाणी धर्म मेळावे आयोजित करुन समाज प्रबोधनाचे फार मोठे महान कार्य केले आहे. त्यांच्या दिव्य शक्ती मधुन त्यांनी अनेक ठिकाणी आपल्या कार्याच्या पताका करून ठेवल्या आहेत. माजलगावसारख्या ठिकाणी दिव्य भव्य असे मठाची रचना केली आहे. सभामंडप व मंगलकार्य उभारले आहे. या मठाच्या माध्यमातुन प्रत्येक अमावस्येला अविश्रांत परिश्रम घेवुन पिडीत दीनदुबळ्यांसाठी आयुर्वेदीक सल्ला देवुन अनेकांचे जीवन सुधारले आहे. अनेकांचे उद्ध्वस्त होणारे संसार थांबविले आहेत. त्यांचे जीवनमान, राहणी व कर्म-कर्तव्य, हक्क या बाबी जर पाहिल्या असता त्यांच्याकडुन खरोखरच प्रेरणा मिळते. माणसावर आलेले नैराश्य क्षणार्धात नाहिसे होते हा माझ्या जीवनातील कटु व सत्य प्रसंग आहे. मी माझ्या जीवनाची वाटचाल तपोरत्नांची सांगड घालुन करित आहे. म्हणुन मी यशाची शिखरे एकामागोमाग एक पादाक्रांत केले आहे. त्यांच्यापासुन मला हिच प्रेरणा मिळाली. त्यांच्याकडे आळस हा गुण नव्हता. दूरदृष्टी त्यांच्या अंगी दिसून आली. साधुसंत असुनही कृषी क्षेत्रामध्ये आवड निर्माण करुन त्यांच्यासारखी अभ्यासू शेती आजही त्यांच्या प्रेरणेने आपणास पहावयास मिळते. त्यांचे समाजाला नेहमी सांगणे असते, इच्छा तेथे मार्ग, इच्छा असल्यानंतर मार्ग काढण्याचा प्रयत्न केला जातो. पण मनात नसल्यावर अनेक बहाण्याचे पेव फुटते. अभ्यासाने कोणतीही गोष्ट साध्य होते व यज्ञ पदरी पडते. अभ्यसाच्या कमीपणामुळे अपयश येते, समजेपर्यंत अभ्यास करावा, भूक आहे तोपर्यंत खात राहावे, सातत्य आणि अभ्यास हे शर्यत जिंकतात व जीवन फुलवतात. यशाचे मधुर चांदणे हवे असेल तर अभ्यासाचा चंद्र तेजोमय ठेवला पहिजे. साथ घ्यावी अभ्यासाची शिखरे गाठण्यासाठी ध्येयाची. ध्येय डोळ्यासमोर ठेवून त्यांची आतापर्यंतची



वाटचाल दिसुन आली, त्यांनी त्यांनी समाजाच्या सुसंस्कृत उभारणीसाठी कपिलधार येथे भव्य असे भक्तनिवास उभारले आहे. त्यामुळे मन्मथ स्वामीच्या पवित्र अशा ठिकाणी सर्व भक्तांची सोय झाली आहे. सर्व भक्तांसाठी निवासगृह, लग्नकार्य व अखंड असे पार्वती अन्नदान, अन्नछत्र आजपर्यंत चालू आहे. गेवराई सारख्या ठिकाणी मंगल कार्यालयाची उभारणी केली आहे. सोलापूर येथे समाजासाठी दिव्यभव्य असे मठ स्थापन केले आहे. परळी येथे अनेक मंदिराच्या जिर्णोध्दार केला असून वीरशैव समाजाला दिशा देण्याचे महान काम केले आहे. औरंगाबाद येथे समाजातील सर्व स्तरातील गोरगरिबांसाठी त्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी वसतिगृहाची स्थापना ३०-४० वर्षापूर्वी करून आज त्या वसतिगृहातुन घाटी दवाखान्यामध्ये येणारे पेशंट व विद्यार्थी उपभोग घेवून बाहेर पडत आहेत, महाराजाबद्दल कृतज्ञता व्यक्त करतात. तसेच श्रीक्षेत्र काशी येथे भक्तासाठी निवासस्थानी बांधले आहे. केदारनाथ दर्शनाला जाण्यासाठी शक्तीमठ येथे भाविक भक्तांची सोय केली आहे. तेथे मोठ्या आपुलकीने व आत्मियतेने महाराजांचे नाव सांगितले. बरोबर त्यांना वंदन करून सर्व सेवा उपलब्ध केली जाते असा मला अनुभव आलेला आहे. अशा महान साधुसंताचे महान कार्य हिंदुस्थानच्या कानपाकोपऱ्यात जेथे तेथे दिसुन येते. असे ध्येयवादी आमचे तपोरत्नं प्रभु पंडिताराध्य शिवाचार्य महाराज हे होते. संसाराच्या रहाट गाड्यात काही आध्यात्मिक गुरु भेटतात त्यांचा शोध घ्यावा लागतो. असे गुरू अध्यात्मकतेचे मार्गदर्शक असतात, शिष्यासाठी काम करतात त्याला चांगला व वाईट अशी भावना नसते, भारतात असा चांगला सदगुरू सापडणे म्हणजे चिंतामणी सापडले आहे. ज्यास तो लाभतो त्याचे जीवन सुखी संसाराचे होते दिव्यात वात नसेल तर तो जळणार नाही तसे जीवनात गुरू नसेल तर जीवन प्रकाशमय होणार नाही, संसारात माणूस अन्न, वस्त्र, निवारा या मुलभूत गरजासाठी सतत धावत असतो. पण समाजात एक असाही वर्ग आहे की, जो याशिवाय कोठे उच्च जीवन जगतो तो योगी पुरूष सदगुरू असतो, त्याच्या आत्म्याचे परमात्म्याशी मिलन झालेले असते. त्याचे जीवन ईश्वरी गुणांनी समृध्द असते, समाजाचा छळही तो सहज सोसत असतो. सदगुरूंची समाजाला दीर्घ काळ गरज असते म्हणून अशा सदगुरूंना उदंड आयुष्य लाभावे, आत्मज्ञान सदगुरु वाचुन होत नाही आत्मज्ञान न झाल्यास अज्ञानी जीव संसाराच्या जीवन मरणाच्या फेऱ्यात राहतो. सदगुरुची कृपा झाली तर ईश्वरही साधका समोर प्रकट होतो व संसारातील अनेक चिंता नष्ट होतात. गुरु तेच आहेत ज्यात गुरूता आहे. ज्या सर्व गृहनता आहे. त्यामुळे ते अशा सर्व देवू शकतात. शारिरीक, मानसिक, बौध्दीक व अध्यात्मिक सर्व बल ते निर्माण करतात. म्हणून ऋषींमुनींनी संतांनी केली, तेच विकास, प्रगती, स्वामितत्व प्रदान करतात, गुरू विष्णू म्हणतात मत्सर, क्रोध, अहंकाराचा संहार करून नाव सार्थक करतात अशा प्रकारे गुरू त्रिदेवाच्या पलीकडील परब्रम्ह आहेत. म्हणूनच वेदात म्हटले आहे. तपोरत्नं प्रभू पंडीताराध्य शिवाचार्य महाराज माजलगावकर यांना भावपूर्ण नमन!!

# तपोरत्नं माजलगावकर महाराजांना साश्रू नयनांनी अखेरचा निरोप



## हजारो शिवभक्तांचे डोळे पाणावले; 'नमः शिवाय'च्या गजरात झाला समाधीविधी

**माजलगाव : येथील सद्गुरू श्री मिस्कीन स्वामी मठ संस्थानचे मठाधिपती श्री तपोरत्नं प्रभू पंडिताराध्य शिवाचार्य माजलगावकर महाराज यांना शनिवार, दि.११ सप्टेंबर रोजी साश्रू नयनांनी अखेरचा निरोप देण्यात आला. यावेळी हजारो शिवभक्तांचे डोळे पाणावले. सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास हिमवत्केदार महापीठाचे जगद्गुरू श्री श्री श्री १००८ भिमाशंकरलिंग शिवाचार्य महास्वामीजी यांच्या मार्गदर्शनाखाली समाधीविधी पार पडला. हजारो शिवभक्तांनी 'ॐ नमः शिवाय'च्या गजरात तपोरत्नं माजलगावकर महाराजांना साश्रू नयनांनी निरोप दिला.**



शुक्रवारी तपोरत्नं प्रभुपंडिताराध्य शिवाचार्य माजलगावकर महाराजांचे निर्वाण झाल्यानंतर जिल्ह्यासह महाराष्ट्र आणि राज्याबाहेरील भक्तांची अंत्यदर्शनासाठी रिघ लागली होती. यावेळी श्री श्री श्री १००८ रावळसिध्दी विभूषित हिमवत्केदार वैराग्य सिंहासनाधिश्वर जगद्गुरू भिमाशंकरलिंग शिवाचार्य महास्वामीजी, वेदांताचार्य सिध्दलिंग शिवाचार्य महाराज साखरखेर्डेकर, श्रीगुरू शंकरलिंग शिवाचार्य महाराज अंबाजोगाईकर, श्रीगुरू नंदिकेश्वर शिवाचार्य महाराज पूर्णेकर, श्रीगुरू पंचाक्षरी शिवाचार्य महाराज माळकवठेकर, पाथरीच्या कांचबसवेश्वर मठाचे श्रीगुरू काशीनाथ शिवाचार्य महाराज, श्रीगुरू सिध्दलिंग शिवाचार्य महाराज शिखर शिंगणापूरकर, श्रीगुरू विरूपाक्ष शिवाचार्य महाराज मुखेडकर, श्रीगुरू विरूपाक्ष शिवाचार्य महाराज मानूरकर, श्रीगुरू महादेव शिवाचार्य महाराज कळमनुरीकर, श्रीगुरू बादेश्वर शिवाचार्य महाराज गिरगावकर, श्रीगुरू महन्तमा स्वामी



महाराज थोरवेकर, वेदांताचार्य सद्गुरू दिगंबर शिवाचार्य महाराज थोरवे मठ वसमतकर, श्रीगुरू सुर्यकांतेश्वर शिवाचार्य महाराज, श्रीगुरू चन्नबसव शिवाचार्य गुरू महालिंग शिवाचार्य बर्दापूरकर यांच्यासह ३० पेक्षा शिवाचार्य महाराज यांची उपस्थिती होती. तसेच कर्नाटक, आंध्रप्रदेश, तेलंगणा या राज्यातील हजारो भक्तगणांनी अंत्यदर्शनासाठी हजेरी लावली. शिवाचार्य महाराज तपोरत्नं प्रभुपंडिताराध्य शिवाचार्य माजलगावकर महाराज यांच्या समाधीविधीस उपस्थित होते. आमदार प्रकाश सोळंके, मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अशोक डक, शिवसेना नेते तथा माजी खासदार चंद्रकांत खैरे, आमदार राधाकृष्ण होके पाटील, मोहनराव सोळंके, रमेशराव आडसकर, अप्पासाहेब जाधव, अशोक होके पाटील, बबनआप्पा खुर्पे, सोमनाथआप्पा हालगे, सोमनाथआप्पा साखरे, प्रभाकर वाघीकर, बाबुराव पेठकर, भालचंद्र पाटील, चंद्रकांत पाटील, शिवाजी वाडेवाले, ज्ञानेश्वर मेंडके, अरूण राऊत, ॲड.सुरेश दळवे आदींसह विविध पक्षांचे नेते कार्यकर्त्यांनी तपोरत्नं महाराजांच्या पार्थिव देहाचे अंत्यदर्शन घेतले. हजारो भक्तगणांनी अंत्यदर्शनासाठी मठात हजेरी लावली.



### गुरूंकडून शिष्याच्या कुटुंबियांचे सांत्वन

माजलगाव : येथील सद्गुरू श्री मिस्कीन स्वामी संस्थान मठाचे नूतन मठाधिपती ष.ब्र.१०८ चंद्रशेखर गुरु प्रभू पंडिताराध्य शिवाचार्य महाराज यांनी शिष्य विलासआप्पा शेटे यांच्या निवासस्थानी भेट देवून शेटे कुटुंबियांचे सांत्वन केले.



## गुरूंचा विरह सहन न झाल्याने

# सेवेकरी शिवचरणी लीन

### माजलगाव मठाचे शिष्य विलासअप्पा शेटे यांचे निधन





माजलगाव : येथील सद्गुरू श्री मिस्कीन स्वामी मठ संस्थानचे पूर्व मठाधिपती लिं.सद्गुरू तपोरत्नं प्रभू पंडिताराध्य शिवाचार्य महास्वामीजी यांचे सेवेकरी आणि मठाचे निस्वार्थी सेवक विलास विठ्ठलअप्पा शेटे (वय ५१) यांचे आपल्या गुरूचा विरह सहन न झाल्याने हृदयविकाराचा त्रास होऊन दुपारी १.४० वाजता निधन झाले. तपोरत्नं माजलगावकर महाराजांचा समाधी सोहळा उरकल्यानंतर काही वेळातच विलासअप्पा शेटे यांनी जगाचा निरोप घेतला. आज शनिवार, दि.१० सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता त्यांचा समाधीविधी येथील वीरशैव रूद्रभूमीत करण्यात आला.

शुक्रवारी दुपारी १ वाजता माजलगाव मठाचे मठाधिपती सद्गुरू श्रीगुरू तपोरत्नं प्रभुपंडिताराध्य शिवाचार्य महाराज शिवचरणी लीन झाले. त्यांचा समाधी सोहळा आज शनिवार, दि.११ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता माजलगाव मठामध्ये करण्यात आला. हा समाधी सोहळा पार पडल्यानंतर विलासअप्पा शेटे यांच्या छातीत त्रास सुरू झाला. तातडीने त्यांना येथील खाजगी हॉस्पीटलमध्ये दाखल करण्यात आले असता येथील डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. गेल्या पंधरा वर्षापासुन विलासअप्पा शेटे कुठल्याही अपेक्षेविना निस्वार्थ भावनेने माजलगाव मठाची सेवा करीत होते. त्यांची काम करण्याची हातोटी आणि विलक्षण चपळता माजलगावकर महाराजांना भावल्याने अगदीच कमी काळात ते त्यांचे विश्वासू सेवेकरी झाले. त्यांच्या अशा अचानक जाण्याने समग्र वीरशैव समाज पुन्हा एकदा शोकसागरात बुडाला असून केवळ दोनच दिवसात हा दुसरा मोठा धक्का या समाजाला सहन करावा लागला आहे. शनिवार, दि.११ सप्टेंबर रोजी सायंकाळी ७ वाजता त्यांचा समाधीविधी येथील वीरशैव रूद्रभूमीत अत्यंत शोककूल वातावरणात करण्यात आला. शेटे कुटुंबियांवर कोसळलेल्या दुःखात वर्तमान माध्यम समूह सहभागी आहे.

# समाजकल्याणासाठी माजलगावकर महाराजांचे अमूल्य योगदान

## शिवसेना नेते चंद्रकांत खैरे यांचा शोकसंदेश

▶ प्रतिनिधी

माजलगाव : तपोरत्नं प्रभू पंडिताराध्य शिवाचार्य माजलगावकर महाराज यांच्या निधनाने समाजाची मोठी हानी झाली असून त्यांनी सर्व समाजाच्या कल्याणासाठी मोठे योगदान दिले. माझे आणि माजलगावकर महाराजांचे कौटुंबिक आणि जिव्हाळ्याचे संबंध होते, असे प्रतिपादन शिवसेना नेते तथा माजी खासदार चंद्रकांत खैरे यांनी आपल्या शोकसंदेशात केले आहे.

माजलगाव येथील सद्गुरू मिस्कीन स्वामी संस्थानचे मठाधिपती तपोरत्नं प्रभू पंडिताराध्य शिवाचार्य महाराज यांच्या निधनाचे वृत्त समजताच माजी खासदार चंद्रकांत खैरे यांनी माजलगाव येथे धाव घेवून महाराजांच्या पार्थिव देहाचे अंत्यदर्शन घेतले. याप्रसंगी त्यांच्यासमवेत शिवसेना बीड जिल्हाप्रमुख अप्पासाहेब जाधव,



सोमनाथआप्पा साखरे, विश्वनाथ स्वामी, रामराजे सोळंके, अभयकुमार ठक्कर, अतुल दुबे, रमेश चौंडे, अतुल उगले, तुकाराम येवले, भगीरथ तोडकरी आदींची उपस्थिती होती. पुढे आपल्या शोकसंदेशात चंद्रकांत खैरे म्हणाले, माजलगावकर महाराजांच्या निधनामुळे माझ्या कुटुंबियांवर दुःखाचे आभाळ कोसळले आहे. त्यांच्या जाण्याने खूप वेदना होत आहेत. माझी आणि महाराजांची खूप जुनी ओळख होती. त्यांच्या आणि माझे कौटुंबिक आणि जिव्हाळ्याचे संबंध होते. माझ्या राजकीय जडणघडणीला महाराजांचे आशीर्वाद लाभलेले होते, अशी प्रतिक्रिया चंद्रकांत खैरे यांनी दिली.



### 'माझा धार्मिक आधार गेला'

तपोरत्नं प्रभू पंडिताराध्य शिवाचार्य माजलगावकर महाराज माझे धार्मिक गुरू होते. माझ्यासारख्या राजकारण्याचा शिवाचार्य महाराज धार्मिक आधार होते. त्यांच्या जाण्याने समाजासह माझी वैयक्तिक हानी झाली आहे, अशी प्रतिक्रिया वर्तमानशी बोलताना माजी खासदार चंद्रकांत खैरे यांनी दिली. प्रतिक्रिया देताना खैरे यांचे डोळे पाणावले होते. तपोरत्नं माजलगावकर महाराज यांच्या दुखःद निधनामुळे समस्त वीरशैव लिंगायत समाज पोरका झाला आहे, असेही खैरे म्हणाले.

# समाजाचा आधारवड कोसळला

## पालकमंत्री धनंजय मुंडे यांची आदरांजली




परळी : माजलगाव येथील सद्गुरू श्री मिस्किन स्वामी मठ संस्थानचे मठाधिपती तपोरत्न प्रभू पंडिताराध्य शिवाचार्य महास्वामी माजलगावकर महाराज यांच्या निधनाचे वृत्त दुःखद असून, माजलगावकर महाराजांच्या जाण्याने समाजाचा आधारवड कोसळला असल्याचे बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी आपल्या शोकसंदेशात म्हटले आहे.

माजलगाव येथील सद्गुरू मिस्किन स्वामी मठ संस्थानचे मठाधिपती तपोरत्न प्रभूपंडिताराध्य शिवाचार्य महास्वामी माजलगावकर महाराज यांच्या निधनाचे वृत्त दुःखद आहे. गेल्या ६०-७० वर्षात समाजाच्या जडणघडणीत महाराजांचे अमूल्य योगदान आहे. समाजाप्रति प्रेम, विद्यार्थी व गरिबांकरिता सतत तळमळ व कणव यामुळे महाराष्ट्र व महाराष्ट्रा बाहेर देखील महाराजांचे अनेक भक्तगण होते. सर्व भक्तगणांच्या दुःखात मी सहभागी आहे. महाराजांच्या जाण्याने समाजाचा आधारवड कोसळला आहे. विनम्र आदरांजली.

### आशीर्वाद गुरूवर्यांचे



माजलगाव : नुकत्याच झालेल्या गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने श्री संस्थान मठ येथे श्रीगुरू तपोरत्नं प्रभू पंडीताराध्य शिवाचार्य महाराज यांचे शुभआशीर्वाद घेताना वर्तमान माध्यम समुहाचे मुख्य संपादक भगीरथ तोडकरी.



# आमदार प्रकाश सोळंकेकडून पूरग्रस्त नुकसानीचा आढावा

▶ प्रतिनिधी



माजलगाव : तालुक्यातील पूराने झालेल्या नुकसानीचा आमदार प्रकाश सोळंके यांनी आढावा घेतला असून शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळावी, यासाठी संबधितांनी तात्काळ पंचनामे करावेत असे निर्देश आमदार प्रकाश सोळंके यांनी दिले आहेत.

गेल्या आठवड्यात अतिवृष्टी आणि पुरामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. या संदर्भात आमदार प्रकाश सोळंके गंगामसला, सरवर पिंपळगाव, सोमठाणा, सुरुमगाव या गावांना भेटी देवून अतिवृष्टी नुकसान महापूर आणि गावातील जोड रस्ते, पूल, वीज, स्मशानभूमी इत्यादी सर्व समस्या जाणून घेतल्या. या सर्व समस्यांची नोंद घेतली आहे. ही सर्व कामे लवकर मार्गी लावण्यात येतील, असे आमदार सोळंके म्हणाले. काही ठिकाणी पुरामुळे शेती वाहून गेली, खरडून जमिनी गेल्या आहेत. त्याचे वेगळे पंचनामे करावेत आणि अतिवृष्टीमुळे जिथे-जिथे शेतीचे नुकसान झाले आहे. त्याचे सरसकट पंचनामे करावे, घरामध्ये पुराचे पाणी शिरले आहेत त्याचे पंचनामे करावे, जिथे घरांची पडझड झाली त्याचे वेगळे पंचनामे करावेत. जिथे-जिथे पंचनामे सुरू झाले नाहीत. तेथील पंचनामे लवकर करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा. अतिवृष्टी आणि पुरामुळे सरसकट शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. त्यामुळे वेळ न लावता सर्व खातेदारांची यादी करून सरसकट पंचनामे करावेत अशा थेट सूचना अधिकाऱ्यांना आमदार प्रकाश सोळंके यांनी करून नुकसानग्रस्तांना दिलासा दिला आहे. नुकसानग्रस्तांना सरसकट मदत मिळाली पाहिजे यासाठी शासनाकडे पाठपुरावा करणार असल्याची ग्वाही सोळंके यांनी दिली. पंचनाम्याबाबत कुठलीही अडचण आल्यास कार्यालयाशी किंवा माझ्याशी थेट संपर्क करावा, या कठीण काळात मी शेतकऱ्यांसोबत असा धीरही आमदार सोळंके यांनी दिला आहे.



## पवारांचे मुंडेकडून अभिष्टचिंतन!




नवी दिल्ली : केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री डॉ.भारती पवार यांचे वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन करताना भाजपा युवा नेते धनराज मुंडे.

## सहकारातील भीष्मपितामह राधेश्याम चांडक यांचा गौरव



बुलढाणा : येथे बुलडाणा अर्बनने १०,००० कोटी ठेवींचा टप्पा पूर्ण केलाबद्दल सहकारातील भीष्मपितामह बुलडाणा अर्बनचे अध्यक्ष राधेश्याम चांडक यांचा गौरव करताना मल्टिस्टेट फेडरेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष सुरेश वाबळे, श्री मंगलनाथ मल्टीस्टेटचे मुख्य कार्यकारी अधिकारी रविंद्र कानडे आदी.

## चाटगावच्या हरीषने केली बालगणेश मंडळाची स्थापना

▶ प्रतिनिधी

दिंद्रुड : चाटगाव येथील चिमुकला हरिष रमेश तिडके या बाल गणेश भक्ताने गणरायाची मूर्ती स्थापन करून बाल गणेश मंडळ उभे केले आहे. हरिषच्या या गणेश भक्तीची आणि धाडसाची सर्वत्र कौतुकाने चर्चा होत आहे.

चाटगाव(ता.धारूर) येथील सामाजिक कार्यकर्ते रमेश तिडके यांचा चिरंजीव हरिषने बाल गणेश मंडळ स्थापन करून गणरायाचे मूर्ती स्थापना केली आहे. या बालगणेश मंडळाला हरिष सोबत अक्षय रमेश तिडके, अशोक महादेव पोटे, अविष्कार निवृत्ती पोटे, करण बाळू केकान, संघर्ष संतोष आवटे, श्रेयश गणेश केकान आदी बच्चेकंपनी हरिषोच्या बरोबर हिरीरीने काम करत आहेत. हरिष हा सात वर्षाचा चिमुकला असून इयत्ता दुसरीत शिक्षण घेत आहे. गेल्या वर्षी पहिलीत असल्यापासून त्याने बाल संवगड्यांना बरोबर घेवून गणेश मंडळ स्थापन केले. यंदा या गणेश मंडळाचे दुसरे वर्ष आहे. दैनंदिन आरती, पूजा करण्यात हरिष सध्या व्यस्त आहे. हरिषच्या या बालगणेश मंडळाच्या गणेश मूर्तीचे सातव्या दिवशी विसर्जन होणार आहे.



# ज्ञानेश्वरी अर्बन अल्पावधीत ग्राहकांच्या विश्वासास पात्र

### आमदार प्रकाश सोळंके यांचे गौरवोद्गार; तृतीय वर्धापनदिन सोहळा उत्साहात साजरा





**आमदार प्रकाश सोळंके यांचा सत्कार करताना ज्ञानेश्वरी अर्बनचे अध्यक्ष बप्पासाहेब फुलगे व उपस्थित जनसमुदाय.**

▶ प्रतिनिधी

माजलगाव : सहकार क्षेत्रात अल्पावधीत ज्ञानेश्वरी अर्बनने वेगळे स्थान निर्माण केले आहे. केवळ तीन वर्षाच्या कालावधीत संस्थेने केलेली प्रगती ग्राहकांचा विश्वास संपादन केल्याचे प्रतीक आहे, असे गौरवोद्गार माजलगावचे आमदार प्रकाश सोळंके यांनी काढले. ते ज्ञानेश्वरी अर्बनच्या तृतीय वर्धापनदिन सोहळ्याच्या अध्यक्ष स्थानावरून रविवारी बोलत होते. दरम्यान, माजलगाव येथील ज्ञानेश्वरी अर्बन को-ऑप क्रेडिट सोसायटीचा तृतीय वर्धापनदिन रविवार, दि.२३ सप्टेंबर रोजी उत्साहात पार पडला.

याप्रसंगी ह.भ.प.श्रीहरी महाराज पवार यांची प्रमुख उपस्थिती तर उद्घाटक म्हणून येडेश्वरी शुगर्सचे अध्यक्ष बजरंग सोनवणे हे होते. या कार्यक्रमासाठी तुळजाभवानी अर्बनचे अध्यक्ष चंद्रकांत शेजुळ, रविंद्र कानडे, दिलीप पारेकर, सतिश सावंत, ॲड.भानुदास डक, संभाजी लोमटे, श्रीनिवास सोळंके, पत्रकार कमलेश जाब्रस, उमेश मोगरेकर आदी मान्यवरांची विशेष उपस्थिती होती. तर सुसेन नाईकवाडे यांचे 'गर्दीत माणसाच्या माणूस शोधतो मी' या विषयावर व्याख्यान झाले.

पुढे बोलताना आमदार प्रकाश सोळंके म्हणाले, तृतीय वर्धापनदिन साजरा होत असलेल्या ज्ञानेश्वरी अर्बनचा यशाचा आलेख उंचावत जावो, सहकार क्षेत्रात गगनभरारी घ्यावी असे सोळंके म्हणाले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक ज्ञानेश्वरी अर्बनचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल फुलगे यांनी तर आभार बप्पासाहेब फुलगे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी माजलगाव परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## 'युवाशक्ती'चे लक्षवेधी गणराय



माजलगाव : शहरातील मेन रोडवरील युवाशक्ती गणेश मंडळाने स्थापन केलेली गणेशमूर्ती शहरवासियांचे लक्ष वेधून घेत आहे.
















आधुनिक विचारांचे वर्तमान
हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि **संपादक : भगीरथ गौरीशंकर तोडकरी,** यांनी तुळजा भवानी पब्लिकेशन,माजलगाव ता.माजलगाव जि. बीड 431131 (महाराष्ट्र) येथे छापून आधुनिक विचारांचे वर्तमान कार्यालय, 23,मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव ता.माजलगाव जि.बीड येथे प्रसिद्ध केले. ईमेल : vartmaneditor@gmail.com भ्रमणध्वनी : **9423209823** RNI : MAHMAR/2018/76928, अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, लेख, व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद माजलगाव न्यायालय अंतर्गत) Postal REG No : L/92/RNP/Beed/2020-2022.